**CNR No. :- MHSI100000072019**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ०२/२०१९ :–

## –: निशाणी १७२ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती होऊन मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्याच्या पान क्र. ९ वरील शेवटुन चौथ्या ओळीत प्रतिवादी क्र. ६० हिचे दावा विषयक मिळकत क्र. १ चे सातबारा सदरी नाव दिक्षा दत्ताराम दळवी नमुद आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी अनावधानाने दिक्षा दत्ताराम गवस असे दाव्याचेकामी नमुद करण्यात आलेले आहे. तरी दिक्षा दत्ताराम गवस या नावाऐवजी ''दिक्षा दत्ताराम दळवी'' असा मजकुर समाविष्ठ करणे, प्रस्तुत दाव्याच्या पान क्र. १४ वरील परिच्छेद क्र. ८ कडील विधान पुर्ण झाल्यानंतर त्यापुढे परीच्छेद क्र. ८.१ मध्ये – ''प्रतिवादी क्र.६६ यांचे वडील व प्रतिवादी क्र. ६७ यांचे पती मयत अंकुश रामचंद्र नाईक यांचे नाव सातबारा सदरी दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. ६६ व प्रतिवादी क्र. ६७ हे मयत अंकुश रामचंद्र नाईक यांना वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ३० याचे वडील व प्रतिवादी क्र. ३१ हिचे पती मयत साबाजी अर्जुन राणे यांचे नाव सातबारा सदरी दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. ३० व प्रतिवादी क्र. ३१ हे मयत साबाजी अर्जुन राणे यांना वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ४४ हिचे पती मयत चंद्रकांत महादेव सावंत

यांचे नाव सातबारा सदरी दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. ४४ ही मयत चंद्रकांत महादेव सावंत यांना वारस आहेत.'' असा मजकुर समाविष्ठ करणे, प्रस्तुत दाव्याच्या पान क्र. १४ वरील परीच्छेद क्र. ८ कडील विधान पुर्ण झाल्यानंतर त्यापुढे परीच्छेद क्र. ८.२ मध्ये – ''दावा विषयक मिळकत क्र. १ चे सातबारा सदरी मोहन चंद्रकांत गवस असे नमुद आहे परंतु, सदरचे नाव सातबारा सदरी चुकीचे नोंद असून प्रतिवादी क्र. २९ मेघना चंद्रकांत गवस असे नोंद असणे आवश्यक आहे.'' असा मजकुर समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदर दुरुस्तीमागे दावा प्रलंबीत ठेवण्याचा कोणताही हेतू नाही. मे. न्यायालयासमोर सत्य वस्तुस्थिती येणे न्यायोचीत व नैसर्गिक न्यायतत्वाच्या प्रणालीला अनुसरुन ठरणारी आहे. सबब, वादी मागत असल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादीचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. ४ व ११ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरीस हरकत उभारुन पुढे त्यांनी न्यायहितार्थ योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादी क्र. १, २, ५, ८, ११, १३, २१, ३५ व ६४ यांना म्हणणे सादर करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत

मुदतीत सादर न केलेने प्रस्तुतचा अर्ज दि.०३.०५.२०२५ रोजी त्यांच्या म्हणण्यावीना चालविणेत आला.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादीच्या म्हणण्यानुसार खालीलप्रमाणे दाव्यात दुरुस्ती होऊन वादी मागत आहे :-

पान क्र. ९ वरील प्रतिवादी क्र. ६० हिचे नाव दिक्षा दत्ताराम गवस ऐवजी ''**दिक्षा दत्ताराम दळवी**'' अशी दुरुस्ती, पान क्र. १४ वरील परिच्छेद क्र. ८ कडील विधान पुर्ण झाल्यानंतर त्यापुढे परीच्छेद क्र. ८.१ मध्ये – ''**प्रतिवादी क्र.६६ यांचे वडील व प्रतिवादी क्र. ६७ यांचे पती मयत अंकुश रामचंद्र नाईक यांचे नाव सातबारा सदरी दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. ६६ व प्रतिवादी क्र. ६७ हे मयत अंकुश रामचंद्र नाईक यांना वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ३० याचे वडील व प्रतिवादी क्र. ३१ हिचे पती मयत साबाजी अर्जुन राणे यांचे नाव सातबारा सदरी दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. ३० व प्रतिवादी क्र. ३१ हे मयत साबाजी अर्जुन राणे यांना वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ४४ हिचे पती मयत चंद्रकांत महादेव सावंत यांचे नाव सातबारा सदरी दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. ४४ ही मयत चंद्रकांत महादेव सावंत यांना वारस आहेत.**'' व परीच्छेद क्र. ८.२ मध्ये – ''**दावा विषयक मिळकत क्र. १ चे सातबारा सदरी मोहन चंद्रकांत गवस असे नमुद आहे परंतु, सदरचे नाव सातबारा**

**सदरी चुकीचे नोंद असून प्रतिवादी क्र. २९ मेघना चंद्रकांत गवस असे नोंद असणे आवश्यक आहे.**'' असा मजकुर समाविष्ठ करणे.

०६. दाव्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दावा अंतीम युक्तीवाद/न्यायनिर्णय या टप्प्यावर असताना प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज वादीने दाखल केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश – VI नियम १७ पाहता, पुरावा संपल्यानंतर अशा प्रकारची कोणतीही दुरुस्ती संयुक्तीक कारणावीना करता येणारी नाही. परंतु, प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जामध्ये वादीने कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. परंतु, या क्षणाला हे समजुन घेणे गरजेचे आहे की, वादी मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तुत दावा हा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. सदर दुरुस्तीची परवानगी दिल्यानंतर पक्षकारांना त्याबाबत स्वतःचा पुरावा व युक्तीवाद करण्याची संधी देता येऊ शकते. जरी वादीने सदरची दुरुस्ती विलंबाने मागितली असली तरी दुरुस्ती मंजूर करणे दोन्ही पक्षकारांच्या हिताचे ठरेल व दावा गुणदोषावर निकाली करणेस मदत होईल. वादीने केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन होणारे आहे. सबब खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :–

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.२,५००/– (रुपये दोन हजार

पाचशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी १७२ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.२,५००/– (रुपये दोन हजार पाचशे मात्र) भरुन; अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यावर तशी दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. सदरची खर्चाच्या रक्कमेपैकी रक्कम रु.१,५००/– (रुपये एक हजार पाचशे मात्र) ही प्रतिवादी क्र. ४ व ११ यांना समप्रमाणात देण्यात यावी व उर्वरीत रक्कम रु. १,०००/– (रुपये एक हजार मात्र) ही मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

४. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.05.09 17:56:58 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०९.०५.२०२५. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

<u>दोडामार्ग</u>.